दिनांक 1-1-1996 रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या/
होणा-या राज्य शासकीय कर्मचा-यांचे "निवृत्तिवेतनविषयक
लाभ" निश्चित करणेबाबत अंतरिम उपाययोजना.

**महाराष्ट्र शासन,**
वित्त विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक सेनिवे-1099/34/सेवा-4,
मंत्रालय, मुंबई 400 032 दिनांक 24 मार्च 1999.

**परिपत्रक**

शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्रमांक वेपूर-1298/प्र.क्र.13/98/सेवा-10, दिनांक 10 डिसेंबर, 1998 अन्वये राज्य शासकीय कर्मचा-यांच्या वेतनश्रेण्या दिनांक 1 जानेवारी 1996 पासून सुधारित करण्यात आल्या आहेत. या वेतनश्रेणी सुधारणेच्या परिणामी जे शासकीय कर्मचारी 1996 रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झाले आहेत किंवा होतील त्यांचे "निवृत्तिवेतनविषयक लाभ" महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, 1998 नुसार निश्चित झालेले सुधारित वेतन विचारात घेऊन, निश्चित करावे किंवा कसे, याबाबतचा प्रश्न शासनाच्या स्वतंत्रपणे विचाराधीन आहे. तथापि, हा निर्णय घेण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता आहे, हे लक्षात घेता व त्यामुळे सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांची आर्थिक कुचंबणा होऊ नये, यादृष्टीने शासन खालील आदेश देत आहे.

"सुधारित वेतनश्रेणीत वेतन घेत असलेले जे शासकीय कर्मचारी दिनांक 1 जानेवारी 1996 रोजी किंवा त्या दिनांकानंतर सेवानिवृत्त झाले आहेत किंवा होतील त्यांना संबंधित कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या सेवानिवृत्तिनंतर त्वरित "तात्पुरत्या स्वरुपात" असुधारित वेतनश्रेणीतील वेतन विचारात घेऊन सध्या अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, 1982 च्या तरतुदी व त्यासंबंधातील सध्याच्या इतर आदेशांच्या तरतुदींनुसार निवृत्तिवेतनविषयक लाभ (मासिक निवृत्तिवेतन, उपदान, निवृत्तिवेतनाची अंशराशीकृत रक्कम इत्यादी) मंजूर करावे. हे लाभ मंजूर करताना सर्व विभाग/कार्यालय प्रमुखांनी प्रकरणपरत्वे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, 1982 च्या यथास्थिती, नियम 126 किंवा 130 अंतर्गत "तात्पुरते निवृत्तिवेतन व उपदान" यांचे प्रदान करताना जी कार्यपध्दती अवलंबिली जाते, त्याच कार्यपध्दतीचा अवलंब करावा. या आदेशांनुसार वरीलप्रमाणे निवृत्तिवेतनविषयक लाभ प्रदान करण्यासाठी संबंधित महालेखापालांची प्राधिकृती आवश्यक असणार नाही."

2. यासंदर्भात शासनाकडून सुधारित आदेश निर्गमित केले जाईपर्यंत हे आदेश लागू रहातील.

3. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, 1961 (सन 1962 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम 248 च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांमधील ज्या कर्मचा-यांचे वेतन उपरोक्त अधिसूचनेनुसार दिनांक 1 जानेवारी 1996 पासून सुधारण्यात आलेले आहे अशा कर्मचा-यांच्या प्रकरणीही लागू राहील.

4. शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृत्तिवेतनाची योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे यांमधील ज्या कर्मचा-यांचे वेतन उपरोक्त अधिसूचनेनुसार दिनांक 1 जानेवारी 1996 पासून सुधारण्यात आलेले आहे अशा कर्मचा-यांच्या प्रकरणीही वरील निर्णय लागू राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रवि भू. बुध्दिराजा,
शासनाचे प्रधान सचिव.

(कृ.मा.प.

एच-1514(13000+40-3-99)

प्रति,

भारत सरकारचे सचिव, वित्त मंत्रालय, नवी दिल्ली,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१२५ प्रती),

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१२५ प्रती),

महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),

महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५ प्रती),

मुख्य लेखा अधिकारी, बी ब्लॉक, दिल्ली प्रशासन, विकास भवन, नवी दिल्ली (५ प्रती),

नियंत्रक, लेखा, परराष्ट्र मंत्रालय, नवी दिल्ली (१० प्रती),

संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (५२० प्रती),

मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),

उप-मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १० प्रती)

वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),

निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),

सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती),

राज्यपालांचे सचिव,

मुख्य मंत्र्यांचे सचिव,

उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,

सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,

*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,

*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,

*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,

*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

मंत्रालयातील सर्व विभाग,

विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,

मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,

सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),

सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),

सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष (प्रत्येकी ५ प्रती),

सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),

शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),

तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),

संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती),

सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),

सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),

शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, दक्षिण/उत्तर/पश्चिम,

सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ (प्रत्येकी ५ प्रती),

सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती),

सर्व जिल्ह्यांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),

कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर (१० प्रती),

कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी (१० प्रती),

कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),

कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती)

ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (१२ प्रती),

शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),

उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती)

कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई (१० प्रती)

वित्त विभागातील सर्व कार्यासने,

निवड नस्ती, कार्यासन सेवा-४

---

*पत्राद्वारे.

१९९९ चा क्रमांक

एच-1514(13000+40-3-99)-अ.